# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 79/2023 दिनांक :19.02.2023

## 1)खुनाचा प्रयत्न :–

**1)मरखेल :–** दिनांक 17.02.2023 रोजी चे 19.30 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे मिरचीचे दुकाना समोर सार्वजनिक रोडवर मौ. हणेगाव ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा त्यांचे मिरची पावडरच्या दुकानात बसला असता यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीचे दुकानात जाऊन फिर्यादीस म्हणाले की, तु शेताच्या व घराच्या वाटणी बाबत कोर्टात केलेली केस उचलुन घे असे म्हणुन फिर्यादीस दुकानातुन रोडवर ओढत आणुन आरोपीतांनी काठीने, डाव्या पायावर, मांडीवर मुक्काम मार मारले तसेच हातातील वाकसीच्या तुंब्याने फिर्यादीच्या डोक्यात मारून गंभीर जखमी केले. फिर्यादीचा मुलगा भांडण सोडविण्यास गेला असता त्याला सुध्दा गंभीर मारहाण करून फिर्यादीचा खुन करण्याचा प्रयत्न केला. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी खबुलपाशा पि. बंदगीसाब कोटग्याळे, वय 45 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. हाणेगाव ता. देगलुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे मरखेल** गुरन 27/2023 कलम 307, 324, 323, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री मद्दे, मो.क्रं. 9049758000** हे करीत आहेत.

**2)मरखेल :–** दिनांक 17.02.2023 रोजी चे 19.30 वा. चे सुमारास, **आरोपीचे मिरचीचे दुकाना समोर सार्वजनिक रोडवर मौ. हणेगाव ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा त्यांचे मो सा वर बसुन हाणेगाव बसस्थानक येथुन त्याचे घराकडे जात असतांना यातील नमुद आरोपीचे मिरचीचे दुकाना समोर आला असता आरोपीने फिर्यादीचे मो सा थांवण्यास सांगुन आबे साले दादा को बोल की, खेत बाट के दो असे म्हणल्याने यातील फिर्यादीने यातील नमुद आरोपीतांना म्हणाले की खेत तो दादा के नाम पर है हम कैसे बाट के देना असे म्हणाला असता यातील आरोपीतांनी हातातील कुऱ्हाडीने, कत्तीने फिर्यादीचे डोक्यात मारून खुन करण्याचा प्रयत्न केला. फिर्यादीचा भाऊ भांडण सोडविण्यास आला असता त्याला सुध्दा मुक्का मार देवुन जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी रूकमोदीन महेमुद कोटग्याळे, वय 22 वर्षे, व्यवसाय शेती रा. हाणेगाव ता. देगलुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे मरखेल** गुरन 28/2023 कलम 307, 324, 323, 204, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोनि/श्री व्ही टी गुट्टे, मो.क्रं. 8830564618** हे करीत आहेत.

## 2)गंभीर दुखापत :–

**1)शिवाजीनगर :–**दिनांक 18.02.2023 रोजी चे 10.00 वा. चे सुमारास, **आपना हॉटेल लालवाडी नांदेड येथे,** यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस दो मिनीट के लिये बाहर आ जा बात करणे की है, असे म्हणुन हॉटेलच्या बाहेर बोलावुन शिवीगाळ करून लाथाबुक्याने मारहाण करून फिर्यादीस गुप्तीने पाठीत व डोक्यात मारून गंभीर दुखापत करून. जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी शुभम उर्फ शिवा जालिंदर दवणे, वय 21 वर्षे, व्यवसाय चालक रा. श्रावस्तीनगर नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरन 48/2023 कलम 326, 323, 504, 506, 34 भादवि सह कलम 4/25 भाहका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री कांबळे, मो. नं. 9970073425** हे करीत आहेत.

## 3)मोटार सायकल चोरी :–

**1)नांदेड ग्रामीण :–**दिनांक 14.02.2023 रोजी चे 23.30 ते दि. 15.02.2023 चे 10.30 वा. चे दरम्यान, **हबीबीया कॉलनी देगलुर नाका ता. जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची यामा एफझेड कंपणीची मो सा क्रमांक एमएच–26/बीएम–5111 किंमती 15,000/–रूपयाची नमुद ठिकाणावरून हॅण्डल लॉक तोडुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी मोहम्मद इमरान मोहम्मद गौस, वय 36 वर्षे, व्यवसाय ड्रायव्हर रा. हबीबीया कॉलनी देगलुर नाका नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्ट नांदेड ग्रामीण** गुरनं 107/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/486 तेलंग, मो.क्र. 9823333377** हे करीत आहे.

## 4)जनावर चोरी :–

**अर्धापुर :–**दिनांक 07.02.2023 रोजी चे 17.00 ते दि. 08.02.2023 चे 03.00 वा. चे दरम्यान, **मौ. चेनापुर तांडा ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे शेतातील आखाडयावरून दोन बैल किंमती 75,000/–रूपयाचे कोणतीरी अज्ञात आरोपीतांनी चोरून नेले. वगैरे **फिर्यादी फकीरा रूपला राठोड, वय 65 वर्षे, व्यवसाय शेतीकाम रा. चेनापुर तांडा ता. अर्धापुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 47/2023 कलम 379, भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री वड साहेब, मो. क्र. 9637101945** हे करीत आहेत.

## 4)चोरी :–

**1)अर्धापुर** :–दिनांक 15.02.2023 रोजी चे 15.30 चे पुर्वी वेळ नक्की नाही, **अर्धापुर शिवार ता. अर्धापुर जि नांदेड येथे,** यातील फिर्यादी यांचे आईचे शेतशिवारातील दोन एकर शेती मध्ये कुसूम योजने अंतर्गत जुना सोलार कंपणीचा 3 एच पी पावरचा सबमर्शिबल पंप किंमती 75,000/–रूपयाचा कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी योगेश प्रल्हादराव माटे, वय 28 वर्षे, व्यवसाय वकील रा. महात्माफुलेनगर अर्धापुर ता. अर्धापुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 48/2023 कलम 379, भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2353 बोदेमवाड, मो.क्र. 9022978909** हे करीत आहेत.

## 5)विवाहीतेचा छळ :–

**1)उस्माननगर** :– 09.02.2022 ते दि. 13.01.2023 चे दरम्यान, **बागी टु तुळजाभवानी शिवनगर नळेगाव रोड मलकापुर ता. उदगीर जि. लातुर ह. मु. कलंबर बुद्रुक ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील नमुद सात आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस कार घेण्यासाठी तुझे माहेरहुन दहा लाख रूपये घेवुन ये तरच मी तुला नांदवतो असे म्हणता फिर्यादी बाईने सांगीतले की माझे आईवडील गरीब परिस्थीतीचे असल्यामुळे त्यांनी तुम्हाला दहा लाख रूपये कुठून देतील व आताच लग्नात बराच खर्च झालेला आहे. असे म्हणुताच आरोपीतांनी फिर्यादीस लाथा बुक्यानी मारहाण करून तिचा शारिरीक व माणसीक छळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 29 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उस्माननगर** गुरनं 17/2023 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा असुन **तपास पोना/127 मुंडे मो.क्रं. 9421390003** हे करीत आहेत.

**2)नांदेड ग्रामीण** :– 26.03.2019 ते दि. 12.06.2022 चे दरम्यान, **फिर्यादीचे सासरी सहयाद्रीनगर कॅनल रोड तरोडा (बु.) नांदेड येथे,** यातील नमुद पाच आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तुला मुलगी कशी झाली, आम्हांस वंशाचा दिवा पाहिजे होता म्हणुन फिर्यादीस शिवीगाळ करून थापडा बुक्याने मारहाण व शिवीगाळ करून तुझे पतीचे नौकरीसाठी माहेरहुन दोन लाख रूपये घेवुन ये नाहीतर तुला नांदवत नाही असे म्हणुन तीचा शारिरीक व माणसीक छळ करून घरातुन हाकलुन दिले. फिर्यादी हि तिचे माहेरी आली असतांना यातील नमुद आरोपी हे फिर्यादीचे माहेरी येवुन फिर्यादी बाईस आमचे मुलाला फारकत दे नाहीतर तुला व तुमच्या मुलाला खतम करून टाकतो अशि जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 26 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 105/2023 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा असुन **तपास सपोउपनि/श्री गिते, मो.क्रं. 91587662002** हे करीत आहेत.

## 6)वैद्यकीय सेवा अधिनियमाचा भंग :–

**1)देगलुर** :– दिनांक 18.02.2023 रोजी चे 16.00 वा. चे सुमारास, **व्यंकटेश्वरा नगर कलामंदीरच्या पाठीमागे कद्रेकर हॉस्पीटल देगलुर ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद चार व इतर आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन मटन विक्रीच्या कारणावरून मारामारी झाल्याने शेख कलीम हा मरण पावल्याचा राग मनात धरून वैद्यकीय व्यवसाय असलेल्या फिर्यादीस त्यांचे कॅबीन मध्ये जाण्यास मज्जाव करून त्यांच्या स्टाफ यांना शिवीगाळ करून थापडाबुक्यांनी मारहाण करून कद्रेकर हॉस्पीटल मधील 1.डीफीब्रीलेटर 2. ई सी जी मशीन 3. मॉनिटर, 4. ऑक्सीजन पाईप लाईन 5. आय व्ही स्टॉड 6. साईड टेबल, चौकशी विभागाचे काच 7. हॉस्पीटल व खिडक्याचे काच इत्यादी साहित्याची तोडफोड करून अंदाजे 12,50,000/–रूपयाचे नुकसान केले. वगैरे **फिर्यादी डॉ. मयुर प्रकाशन कद्रेकर, वय 33 वर्षे, व्यवसाय डॉक्टर रा. कळसकर गल्ली देगलुर ता. देगलुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरनं 84/2023 कलम 143, 147, 149, 323, 427, 341, 504 भादवि, सह कलम 4, 6 महाराष्ट्र वैद्यकीय सेवा व्यक्ती वैद्यकीय सेवा संस्था (हिंसक कृत्य व मालमतेची हाणी किंवा नुकसान प्रतिबंध अधिनियम 2010) कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री मुंडे, मो. क्रं. 7774840493** हे करीत आहेत.

## 7)भारतीय हत्यार कायदा :–

**1)इतवारा** :–दिनांक 18.02.2023 रोजी चे 03.30 वा. चे सुमारास, **मन्यारगल्ली जुनागंज नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकादेशीररीत्या आपले ताब्यात एक लोखंडी खंजर बाळगलेला मिळुण आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री उमेश गौतम रायबोळे, ने. पोस्टे इतवारा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 57/2023 कलम 4/25, भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/925 कोंडेकर, मो.क्र. 02462–236510** हे करीत आहेत.

## 8)प्रोव्हिबीशन :–

**1)वजिराबाद :–** दिनांक 18.02.2023 रोजी चे 14.30 वा. चे सुमारास, **खडकपुरा नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 1750/–रुपयाची चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/मनोज बापुसिंघ परदेशी, ने. पोस्टे वजिराबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 50/2023 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2575 कांबळे मो.नं. 9552303028** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड